# छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

(आरोग्य विभाग)

जा.क्र.मनपा /आरोग्य /3404 /२०२४ दिनांक :- 26 /12 /२०२४

**जाहिर प्रगटन**

**बाम्बे नर्सिग रजिस्ट्रेशन होम ॲक्ट -१९४९ (अमेंडमेंट- २००५)**

महाराष्ट्र शासन बाम्बे नर्सिग होम रिजस्ट्रेशन ॲक्ट -१९४९ (अमेंडमेंट- २००५) आणि महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार-ब, असाधारण क्रमांक 20, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई दिनांक 14.01.2021. रोजीच्या अधिसूचने नुसार छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका, हद्दीतील सर्व खाजगी नर्सिग होम यांनी पंजीकरण/नुतनीकरण करुन घेणे बंधनकारक आहे.

- यापुर्वी ज्या नर्सिगहोमचे पंजीकरण झाले आहे, त्यांनी दर ०३ वर्षाला नुतनीकरण करुन घेणे बंधनकारक आहे.
- छत्रपती संभाजीनगर शहरातील ज्या खाजगी वैद्यकीय व्यावसायीकांची नर्सिगहोम नोंदणीची मुद्दत दि. ३१.०३.२०२५ रोजी संपणार आहे. त्या खाजगी नर्सिगहोम धारकांनी महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार-ब, असाधारण क्रमांक 20, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई दिनांक 14.01.2021. च्या अधिसूचने नुसार खाजगी नर्सिगहोम धारकांनी माहे **जानेवारी 2025 मध्ये अधिसूचनेतील नियम (4) च्या उप नियम (1) मध्ये निर्धारित केलेल्या शुल्कासह नमूना-बी मध्ये नोंदणी किंवा नूतनीकरणासाठी आगाऊ अर्ज करणे हे नियमानुसार बंधनकारक आहे.**
- मनपाच्या अधिकृत **Website** https://www.aurangabadmahapalika.org/ वर लॉगिंग करुन **RTS (Right to Services)** वरती क्लिक करुन नुतनीकरणाचा प्रस्ताव हा online आणि ऑफलाइन विभागास सादर करुन दिनांक ३१ मार्च २०२५ पर्यंत नुतनीकरण करुन नोंदणी प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे.
- नसता कायद्यानुसार रुपये १०,०००/- दंड किंवा सहा महिन्याचा कारावास किंवा दोन्ही अशी कायदेशीर कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.
- नविन नोंदणी तसेच नुतनीकरणासाठी आवश्यक कागदपत्रांची यादी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या www.contact@aurangabadmahapalika.org संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

**निबंधक**
नर्सिगहोम नोंदणी कायदा १९४९
तथा
वैद्यकीय आरोग्य अधिकारी
महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर